संक्षिप्त फौ. ख. क्र. ३६८/२०२५
सरकार -वि.- अनिल सोलंखी
नि.क्र. ६ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - सोमनाथ लक्ष्मण मडावी,
वय ३० वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – जवळी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

<u>**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**</u>

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे. दिनांक १०.०५.२०२५ रोजी पोलिसांनी मला कोठेही बोलाविले नव्हते. माझ्या समक्ष पोलिसांनी कुठलीही कारवाई केली नव्हती. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहीत नाही.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे ३.०१.२०२**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०.०५.२०२५ रोजी पोलीसांनी मला मौजा जवळी शिवार, ता. भिवापूर येथे पंचनाम्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन ७ देशी दारुच्या निपा जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. मी

भास्कर उरकुडेला ओळखत नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३.	नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक – ०९.०३.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.